**पुढारी** | ११ जुलै २००८

# संपूर्ण विचार करून दिशा ठरवणे आवश्यक : प्रा. नवले

**हडपसर** (प्रतिनिधी) : दहावीनंतर अभियांत्रिकी शिक्षण घेण्यासाठी डिप्लोमा करावी, की बारावी सायन्सनंतर अभियांत्रिकी पदवी शिक्षण घ्यावे, असा संभ्रम विद्यार्थी व पालकांमध्ये दिसून येतो. त्यातील आपली निश्चित उद्दिष्ट्ये, क्षमता आणि संभाव्य धोके याचा विचार करूनच दिशा ठरविणे उचित ठरते, असे मत करिअर मार्गदर्शक प्रा. विजय नवले यांनी व्यक्त केले.

पुण्यातील 'एम पॉवर' या शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेने 'दहावीनंतर अभियांत्रिकीची दिशा' या विषयावर विद्यार्थी व पालकांसाठी मार्गदर्शक व्याख्यानाचे आयोजन केले होते. त्यावेळी संवाद साधताना प्रा. विजय नवले बोलत होते. एम. पॉवरचे महेश नारके यांनी संयोजन केले. अश्विनी वाघ यांनी सूत्रसंचालन केले.

---

सकाळ : पुणे
बुधवार, २२।१०।२००८

**संक्षिप्त**

## आवटे महाविद्यालयात उपग्रहाद्वारे प्रशिक्षण

मांजरी, ता. २१ : अण्णासाहेब आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयातील 'ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट' विभागाच्या वतीने उपग्रहाद्वारे प्रशिक्षण देणाऱ्या उपक्रमाची सुरवात करण्यात आली . 'अॅवरॉन' या संस्थेने आयोजित केलेल्या 'अॅप्टिट्यूड टेस्ट' या विषयावरील श्रीमती सारा इफ्फत यांच्या व्याख्यानाचे प्रक्षेपण विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. महाविद्यालयातील प्रशिक्षण अधिकारी प्रा. विजय नवले म्हणाले, ''या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना विविध तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळेल.'' प्राचार्य डॉ. के. आर. हरणे यांनी सांगितले, ''महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल.''

---

**कॉलेजविश्व**

**उपग्रह प्रशिक्षण**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब गोपाळराव आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट' विभागातर्फे, उपग्रहाद्वारे प्रशिक्षण देणाऱ्या उपक्रमाची सुरवात झाली. चेन्नई येथील अॅवरॉन या संस्थेतर्फे श्रीमती सारा इफ्फत यांनी 'बुद्ध्यांक चाचणी'वर मार्गदर्शन केले. उपग्रहाच्या या यंत्रणेची संरचना करून त्याद्वारे देशभरातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळू शकेल, अशी माहिती प्रशिक्षण अधिकारी प्रा. विजय नवले यांनी दिली. प्राचार्य डॉ. के. आर. हरणे यांनी प्रास्ताविक केले.

सकाळ : पुणे
मंगळवार, ३०।०९।२००८